**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
केंद्रीय कापूस संशोधन संस्था
नागपूर

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 18-10-2021**

**नागपूर(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2021-10-18 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2021-10-19 | 2021-10-20 | 2021-10-21 | 2021-10-22 | 2021-10-23 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 8.4 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 30.9 | 31.5 | 32.0 | 31.6 | 31.3 |
| किमान तापमान (अं.से) | 23.2 | 22.8 | 22.4 | 22.2 | 21.8 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 92 | 88 | 82 | 78 | 71 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 88 | 82 | 77 | 72 | 65 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 7.0 | 7.0 | 7.0 | 6.0 | 5.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 275 | 308 | 295 | 310 | 335 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 7 | 6 | 4 | 3 | 2 |

## हवामान सारांश / चेतावणी:

नागपुर जिल्ह्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या जिल्हास्तरीय मूल्य वर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस (१९ ऑक्टोबर २०२१ ते २३ ऑक्टोबर २०२१) आकाश आंशिक ढगाळ ते ढगाळ राहण्याची शक्यता तसेच दिनांक १९ ऑक्टोबर २०२१ रोजी काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस होण्याची अधिक शक्यता तसेच दिनांक २०, २१, २२ आणि २३ ऑक्टोबर २०२१ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दीर्घ मुदतीच्या अंदाजानुसार, विदर्भ उप विभागामध्ये दिनांक २३ ऑक्टोबर २०२१ ते २९ ऑक्टोबर २०२१ दरम्यान सरासरी एवढा पाऊस आणि कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी तर किमान तापमान सरासरी एवढे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

परिपक्व अवस्थेतील सोयाबीन व इतर पिकाची काढणी व मळणी ची कामे लवकरात उरकून घ्यावीत. मळणी च्या कामी विलंब होत असलाय्स काढणी केलेले पिक शेतातील उंचवट्यावर साठवावे आणि ताडपत्रीच्या साहाय्याने झाकून ठेवावे. कृषी रसायनाच्या फवारणीची, आंतरमशागतीची कामे तसेच उभ्या पिकात खते देण्याची कामे हंगामी पिके, भाजीपाला आणि फळबागांमध्ये स्थानिक हवामानाचा अंदाज लक्षात पुढील दोन दिवसामध्ये घेऊन उरकून घ्यावीत.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

रब्बी हंगामातील पेरणी करण्यापूर्वी शिफारशीत असलेल्या सक्रीय घटकाची बीज प्रक्रिया करावी.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| हरभरा | हरभरा पिकाचे पेरणीकरिता देशी वाण आणि बियाणे दर- हिरवा चाफा (एकेजीएस- १), विजय आणि आयसिसिव्ही- १० (५०-६० किलो बियाणे प्रती हेक्टर), पिकेव्ही हरिता (एकेजी- ९३०३- १२) आणि जाकी |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | ९२१८ (७५- ८५ किलो बियाणे प्रती हेक्टर बियाणे), काबुली वाण आणि बियाणे दर पिकेव्ही काबुली- २ आणि पिकेव्ही काबुली- ४ (११०- ११५ किलो बियाणे प्रती हेक्टर), गुलाबी हरभरा वाण गुलक- १ (७५-८५ बियाणे प्रती हेक्टर) या प्रमाणात १५ ऑक्टोबर ते १५- ३० नोव्हेंबर पर्यंत पेरणी करावी. पिकेव्ही कांचन (एकेजी- १९०९) या वाणाची ५०-६० किलो बियाणे प्रती हेक्टर या प्रमाणात १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर पर्यंत करावी. हरभरा बियाण्यास पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास ५ ग्राम ट्रायकोडर्मा किंवा २ ग्राम थायरम + २ ग्राम कार्बेन्डाझिम बीजप्रक्रिया, यानंतर २५० ग्राम रायझोबियम (नत्र स्थिरीकरण करणारे जिवाणू) आणि २५० ग्राम पी. एस. बी. (स्फुरद विरघळविणारे जिवाणू) प्रती १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणात मिसळून बीज प्रक्रिया करावी. बीज प्रक्रिया केल्यानंतर तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी. |
| सोयाबीन | सोयाबीन काढणी व मळणी व्यवस्थापन: शेतकरी बांधवांनी परिपक्व अवस्थेत असलेल्या पिकाची तात्काळ स्थानिक हवामानाचा अंदाज घेऊन काढणी करावी व काढणी केलेले पिक शेतातील उंचवट्यावर साठवावे आणि मळणी ची कामे शक्य नसल्यास ताडपत्रीच्या साहाय्याने झाकून ठेवावे. सोयाबीन चे कापणी केलेले पिक स्थानिक हवामान अंदाज लक्षात घेता दोन ते तीन दिवस उन्हात वाळवावे व कापणी केलेले पिक सुरक्षित ठिकाणी ठेवावे व ताडपत्रीच्या सहाय्याने झाकावे व मळणी ची कामे सोयीनुसार उरकून घ्यावी. पुढील हंगामात सोयाबीन चे उत्पादन बियाणे म्हणून वापरावयाचे असल्यास सोयाबीन ची मळणी करताना मळणी यंत्राचा वेग ३५० ते ४०० आरपीएम एवढा ठेवावा जेणेकरून बियाण्याचे अंकुराचे नुकसान टाळता येईल. सोयाबीनचे बियाणे साठवितांना त्यात ओलाव्याचे प्रमाण ८ टक्के पेक्षा जास्त नसावे. १०० किलोच्या पोत्याची ५ पेक्षा मोठी थप्पी लाऊ नये. बियाण्याची पोत्याची आदळ आपट करू नये. |
| कपाशी | कपाशी वेचणी व्यवस्थापन: ज्या भागात कापूस पिक पिकाची बोंडे फुटून कापूस बाहेर पडण्याच्या अवस्थेत आहे तेथे तयार कापसाची वेचणी करून कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. कपाशी अन्नद्रव्य व्यवस्थापन: कपाशी पिक फुलोरा अवस्थेत असताना २ % युरिया ची तर बोंडे विकसित होण्याच्या अवस्थेत २ % डीएपी ची स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती बघून फवारणी करावी. कपाशीमध्ये लाल्या विकृती टाळण्यासाठी १ % युरिया व १ % माग्नेशियाम सल्फेट ची बोंडे विकसित होण्याच्या अवस्थेत फवारणी करावी. कपाशी पाते, फुल गळ व अतिरिक्त वाढ व्यवस्थापन: कपाशीमध्ये नैसर्गिक पाते आणि फुल गळ टाळण्यासाठी अल्फा – एनएए ४.५ एसएल ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती बघून फवारणी करावी.तसेच कपाशी पिकाची अतिरिक्त कायिक वाढ रोखण्यासाठी क्लोरमेकवेट क्लोराईड ५० एसएल १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती बघून फवारणी करावी. कपाशी गुलाबी बोंड अळी व्यवस्थापन: कपाशीमध्ये गुलाबी बोंड अळीच्या पतंगांच्या हालचालीवर निरीक्षण करण्यासाठी एकरी दोन याप्रमाणेपेक्टीनोल्युर अथवा गॉसिप्ल्युर हे सक्रिय घटक असलेले कामगंध सापळेलावावेत. कामगंध सापळ्या मध्ये अडकलेल्या पतंगांची नियमितपणे निरीक्षणे नोंदवावीत.पतंगांनी आर्थिक नुकसान पातळी (८ पतंग प्रति सापळा प्रति रात्र असे सलग तीन रात्री) ओलांडल्याचे निदर्शनास येताच शिफारशीत असलेल्या रासायनिक कीटकनाशकांचा अवलंब करावा. प्रादुर्भावग्रस्त डोमकळ्या वेचून त्वरित नष्ट कराव्यात (आर्थिक नुकसान पातळी- १० % डोमकळ्या प्रादुर्भाव ग्रस्त फुले). हिरवी बोंडे लागल्यानंतर दर आठवड्याला यादृच्छिक पद्धतीने एकरी २० बोंडांचे (१ बोंड प्रति झाड) निरीक्षण करावे. (आर्थिक नुकसान पातळी- १० टक्केप्रादुर्भावग्रस्त बोंडे). उपलब्धतेनुसार ट्रायकोग्रामा बॅक्ट्री या अंड्यावर उपजीविका करणाऱ्या परोपजीवी मित्रकीटकाचे ६० हजार प्रति एकर याप्रमाणे पात्या-फुले लागण्याच्याअवस्थेपासून १५ दिवसांच्या अंतराने तीनदा प्रसारण करावे.जैविक घटकांचा कीडनियंत्रणासाठी वापर करण्याच्या किमान एक आठवडा आधी आणि एक आठवडा नंतर रासायनिक कीटकनाशकांचा वापर करू नये. गुलाबी बोंड अळीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असलेल्या ठिकाणी निंबोळी आधारित किटकनाशक ५० मिली किंवा क्लोरपायरीफॉस २० % ईसी २५ मिली किंवा क्विनालफॉस २० % एएफ २० मिली किंवा थायोडीकार्ब ७५ डब्ल्यूपी २० ग्राम किंवा प्रोफेनोफॉस ५० ईसी ३० मिली किंवा इंडोक्साकार्ब १४.५ एससी ५ मिली किंवा ईमामेक्टीन बेन्झोएट ५ एसजी ५ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती बघून फवारणी करावी. |
| कपाशी | कपाशी रोग व्यवस्थापन: खबरदारीचा उपाय म्हणून कपाशीतील आंतरिक बोंड सड रोगाच्या व्यवस्थापनासाठी सुरुवातीच्या बोंडे विकसित होण्याच्या अवस्थेमध्ये कॉपर ऑक्सीक्लोराइड ५०% डब्लु.पी. (२५ ग्रॅम)+ स्ट्रेप्टोसायक्लीन (१ ग्रॅम) यांचे मिश्रण प्रति १० लिटर पाण्यात मिसळून स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती बघून फवारणी करावी. कपाशीमध्ये आकस्मिक मर रोगाची लक्षणे दिसून आल्यास प्रादुर्भाव ग्रस्त शेतामध्ये व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझिम ५० % डब्ल्यूपी. २० ग्राम + १०० ग्राम युरिया प्रती १० लिटर पाणी पिकाला वाफसा आल्यानंतर आळवणी करावी. कपाशीची बाह्य बोंड सड टाळण्यासाठी प्रोपीकोनाझोल २५ ईसी १ मिली किंवा प्रोपिनेब ७५ डब्ल्यूपी २.५ ते ३ ग्राम प्रती १ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कपाशीवरील बुरशीजन्य पानावरील ठिपके जसे कि, कोरायनीस्पोरा/टार्गेटेड बुरशीजन्य ठिपके किंवा इतर बुरशीजन्य ठिपक्यांचे व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझीम ५० डब्ल्यूपी १० ग्राम किंवा प्रोपीकोनाझोल २५ ईसी १० मिली किंवा प्रोपिनेब ७० डब्ल्यूपी २५ ते ३० ग्राम किंवा मेटीराम ५५ % पायराक्लोस्ट्रोबिन ५ % डब्ल्यूजी २० ग्राम किंवा अझोक्सिस्ट्रोबीन 18.२ % डब्लूडब्ल्यू + |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | डायफेनकोनाझोल ११.४ % डब्ल्यूडब्ल्यू एससी १० मिली किंवा फ्ल्यूक्झापायराक्साड १६७ g/L + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ g/L एससी ६ ग्राम किंवा क्रेसोक्झाम ४४.३ % एससी १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. कपाशीवरील दहिया रोगाच्या व्यवस्थापनासाठी अझोक्सिस्ट्रोबीन 1४.२ % डब्लूडब्ल्यू + डायफेनकोनाझोल ११.४ % डब्ल्यूडब्ल्यू एससी १० मिली किंवा क्रेसोक्झाम ४४.३ % एससी १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. कपाशी रस शोषक कीड व्यवस्थापन: कपाशीमध्ये पाते, फुले आणि सुरुवातीच्या बोंडे भरण्याच्या अवस्थेमध्ये रस शोषक किडींचे (फुलकिडे व तुडतुडे) निरीक्षण करावे व आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास थायमेथोक्झाम २५ डब्ल्यूजी २ ग्राम किंवा डिनोटेफ्युरोन २० एसजी ३ ग्राम प्रती १० लिटर किंवा डायफेन्थीयुरोन ५० डब्ल्यूपी १२ ग्राम प्रती १० लिटर पाणी (न्यापस्याक किंवा चलित फवारणी पंप) या प्रमाणात स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती बघून फवारणी करावी. जर फुलकिड्यांचा (टीएस्व्ही रोगाचा प्रसार करण्यास कारणीभूत) प्रमुख प्रादुर्भाव असल्यास व आर्थिक नुकसान पातळी गाठली असलाय्स थायमेथोक्झाम २५ डब्ल्यूजी २ ग्राम किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ८.५ मिली किंवा डिनोटेफ्युरोन २० एसजी ३ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती बघून फवारणी करावी. |
| गहू | गहू पिकासाठी मध्यम भारी, खोल व पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. गहू पिकासाठी जमीन तयार करताना १५ ते २० सेंमी खोल नांगरणी करावी. वखराच्या २ ते ३ पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. पूर्वीच्या पिकाची धसकटे, काडी कचरा वेचून शेत स्वच्छ करावे. गहू लागवड शक्यतो समपातळीत असावे जेणेकरून पुढील ओलीत व्यवस्थापन करता येईल आवश्यकता भासल्यास जमीन समपातळीत आणण्यासाठी पाटा मारावा.कोरडवाहू गहू पिकाची पेरणी ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात करावी. कोरडवाहू गहू पेरणीस प्रती हेक्टरी ७५ किलो बियाणे वापरावे. कोरडवाहू गव्हाची पेरणी जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असतानाच करावी आणि पेरलेले बियाणे ओलाव्यात पडेल याची पुरेशी दक्षता घ्यावी. कोरडवाहू वेळेवर पेरणीसाठी दोन ओळीमध्ये २३ सेंमी अंतर ठेवावे. गहू पेरणी वेळी ५ ते ६ सेंमी पेक्षा खोल पडणार नाही याची काळजी घ्यावी.कोरडवाहू गहू पेरणीकरिता एकेडीडब्लू २९९७- १६ (शरद), पिडीकेव्ही वाशीम (डब्लूएसएम- १४७२), एमएसीएस १९६७ आणि एनआय ५४३९. पिडीकेव्ही वाशीम (डब्लूएसएम- १४७२) या वाणाची मर्यादित ओलीत उपलब्ध परिस्थितीमध्ये निवड करावी. बागायती गहू वेळेवर पेरणीसाठी एकेडीडब्लू १०७१ (पूर्णा), एकेडीडब्लू ३७२२ (विमल), एचडी २१८९ आणि एचडी २३८० या वाणाची निवड करावी. बागायती गहू उशिरा पेरणीसाठी पिडीकेव्ही सरदार (एकेएडब्लू ४२१०-६), एकेएडब्लू ४६२७, एकेएडब्लू- ३८१, एकेएडब्लू १०७१ (पूर्णा) आणि एचआय ९७७ या वाणाची निवड करावी. गहू बियाण्यास पेरणीपूर्वी थायरम किंवा विटावॅक्स ७५ टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी २.५ ग्राम प्रती किलो त्याचबरोबर अॅणझोटोबॅक्टर हे नत्र स्थिरीकरण करणारे जीवाणू संवर्धन आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू खत प्रत्येकी २५० ग्राम प्रती १० ते १२ किलो बियाण्यास लावून बीजप्रक्रिया करावी. |
| लसून | लसून लागवडीसाठी नांगरणी व वखरणी करून शेत सपाट व भुसभुशीत करावे. शेतात हेक्टरी ५० तन शेणखत व कंपोस्ट खत मिसळावे. लागवडीकरिता सरी वरंबा पद्धतीचा अवलंब करावा. वरंब्याची लांबी ४ फूट व लांबी जमिनीच्या उताराला ६० ते ७० मीटर पर्यंत ठेवावी जेणेकरून ठिंबक सिंचनाचे पाणी व्यवस्थापन योग्य रीतीणे होईल. लागवड १० सेंमी x १० सेंमी अंतरावर टोकन पद्धतीने करावी. कळ्या २ ते ३ सेंमी पेक्षा खोलवर लावू नये. पेरणीपूर्वी वाफ्यामध्ये हेक्टरी ६० ते ७० किलो नत्र, ६० ते ७५ किलो स्फुरद व ५० किलो पालाश या प्रमाणात खते मिसळावीत. |
| तूर | तुरीवरील आकस्मिक रोग प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनाकरिता झाडाच्या मुळाजवळ कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी घेऊन आळवणी करावी. पिकामध्ये हेक्टरी किमान ४ - ५ कामगंध सापळे लावावे. या सापळ्या मध्ये अडकलेले नर पतंग वेळोवेळी काढून नष्ट करावे तसेच विशिष्ट कालावधीत वड्या (ल्युर) बदलावे. |
| भुईमूग | स्थानिक हवामान परिस्थिती बघून पिकाची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| मोसबी | नर्सरी धारकांनी रंगपूर किंवा जम्बेरी बियांची पेरणी प्लास्टिकच्या ट्रे मध्ये करावी.संत्रा आणि मोसंबी पिकामध्ये रस शोषणाऱ्या पतंगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास पतंगांना आकर्षित करून मारण्यासाठी १० मॅलेथिओन, १०० मिली संत्रा ज्यूस १०० ग्राम गुळ ९०० मिली पाण्यात विषारी द्रावण तयार करून रुंद शिशी मध्ये भरावे व प्रती २५ झाड दोन शिश्या फळबागेत लटकाव्या. गळलेल्या फळांना एकत्र करून मातीत दाबून नष्ट करावे.त्याचबरोबर कडू लिंबाची ओलि पाने व गोवऱ्या याचा बगीचा मध्ये संध्याकाळी ६ ते १० पर्यंत धूर करावा. फळमाशीच्या व्यवस्थापनासाठी मिथिल युजेनोल सापळे ६० दिवस फळ काढणी पूर्वी प्रती हेक्टर २० या प्रमाणात लावावे. ३० दिवसाच्या अंतराने ल्युर बदलावे. नागपुरी संत्र्यावर फायटोप्थोरा ब्राऊन रॉट रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रादुर्भाव ग्रस्त फळबागांमध्ये फोसेटील अल्युमिनिअम किंवा मेफेनोक्झाम एमझेड- ६८ २.५ ग्राम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तन व्यवस्थापनासाठी वाफसा परिस्थिती नघून आंतरमशागतीची कामे (डवरणी, निंदनी, वखरणी) करावी. आंबिया बहराच्या फळबागेत कार्बेन्डाझीम ७५ % डब्ल्यूपी या बुरशीनाशकाची १५ दिवसाच्या अंतराने स्वच्छ हवामान परिस्थिती बघून १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. आंबिया बहारच्या फळ |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | गळ रोखण्यासाठी संत्राच्या झाडाला १.५ ग्राम २-४ डी + १ टक्के युरिया (१०० लिटर पाण्यात १ किलो युरिया) १०० लिटर पाणी किंवा गिब्रेरेलिक ॲसिड(जीए) १.५ ग्राम प्रती १०० लिटर पाण्यात मिसळून ची संत्राच्या झाडाला फवारणी करावी. मृग बहरतील फळांचा आकार वाढण्यासाठी १ ग्राम २-४ डी किंवा जिब्रेलिक ॲसिड याची २ टक्के मोनोपोटाशीअम फॉस्फेट, डायअमोनियम फॉस्फेट, पोटाशीअम नायट्रेट आलटून-पालटून १५ दिवसाच्या अंतराने झाडावरील भार अंदाज घेऊन फवारणी करावी. नमूद फवारणी ची कामे स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती बघून करावी. |
| भात | धान काढणी व मळणी व्यवस्थापन: लवकर परिपक्व झालेल्या धान पिकातील लोम्ब्यामधील ९० टक्के दाने परिपक्व झाल्यानंतर धानाची कापणी करावी तसेच कडबा पूर्णपणे वाळल्यानंतर मळणी करावी. धान तुडतुडे कीड व्यवस्थापन: तुडतुडे किडीच्या व्यवस्थापनासाठी, अझाडीरेक्टीन ०.१५ % (१५०० पि.पि.एम.) @ ३० मि.ली. किंवा मेटारायझियम अनीसोपली ही जैविके २.५ कि.ग्रॅ. प्रती हेक्टर किंवा इमिडाक्लोप्रीड १७.८ एस. एल. @२.२ मि.ली. किंवा फिप्रोनिल ५ एस.सी. @ २० मि.ली. किंवा फ्लोनीकॅमीड ५० डब्लु.जी. @ ३.० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. धान पर्णकोष करपा रोग व्यवस्थापन: पर्णकोष करपा रोगाच्याव्यवस्थापनासाठी टेबूकोनॅझोल २५.९ ई.सी. @ १५ मि.ली. किंवा प्रोपिकोनॅझोल २५ ई.सी. @ १० मि.ली. किंवा हेक्झाकोनॅझोल ५ ई.सी. @ २० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. धान पर्णकोष कुजव्या रोग व्यवस्थापन: पर्णकोष कुजव्या रोग व्यवस्थापनासाठी, हेक्झाकोनॅझोल ७५ डब्लु.जी.@१.३३ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. धान दाणे रंगहीनता व्यवस्थापन: दाणे रंगहीनता व्यवस्थापनासाठी, धान पिक फुलोरा अवस्थेत असतांना दुपारच्या वेळी खालील प्रमाणे कोणत्याही एका बुरशीनाशकाची फवारणी करावी. हेक्झाकोनॅझोल ४ % + झायनेब ६८% डब्लू.पी. @ २० ते २५ ग्रॅम किंवा टेबूकोनॅझोल ५०% + ट्रायफ्लोक्झीक्ट्राबिन २५% डब्लू.जी. @ ४ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून दुपारनंतर फवारणी करावी. सर्व फवारणीची कामे स्वच्छ हवामान परिस्थिती पाहून करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कांदा | गादीवाफ्यावर कांदा बियाणे हेक्टरी ८ ते १० किलो पेरावे.कांदा लागवडीसाठी पांढऱ्या कांद्याच्या जाती: अकोला सफेद, फुले सफेद, यशोदा, भीमा श्वेता आणि पुसा व्हाईट राउंड व लाल कांद्याच्या जाती: पुसा रेड, एन २-४-१, निफाड-५३ आणि बसवंत ७८० या वाणाची निवड करावी. |
| अळशी | कोरडवाहू जवस पिकाची (वाण- एनएल-९७ आणि पिकेव्ही एनएल- २६०) पेरणी ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात तर बागायती पिकाची पेरणी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवडयापर्यंत करावी. पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास कार्बेन्डाझीम २ ग्राम किंवा थायरम ३ ग्राम लाऊन बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर ३ तासांनी अॅ झोटोबॅक्टर २० ग्राम व स्फुरद विरघळणारे जीवाणू २० ग्राम प्रती किलो बियाणे या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | जनावरांसाठी पोषक चारा उपलब्धतेसाठी लुसर्न आणि बरसीम या चारा पिकाची लागवड करावी. |
| म्हैस | जनावरांचा गोठा हा स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवा. जंतनाशकाची मात्रा ३महिन्यांच्या आधी केली नसल्यास जनावरांना जंतनाशकाची मात्रा द्यावी. गोठ्याचे निर्जंतुकीकरण २ टक्के फार्मेलिन चे द्रावण तयार करून करावी. जनावरांमध्ये अतिसारआणि अपचन टाळण्यासाठी लहान आणि मोठ्या जनावरांना कोरडा चाऱ्याचा आहारात समावेश करावा. चारा पिकासाठी शिफारस केलेली रासायनिक खतांची मात्रा द्यावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | कांदा, लसून, मुळा, मेथी, पालक, श्रावण घेवडा, बटाटा,गाजर, गवार, वाटणा इत्यादी भाजीपाला पिकाची लागवड करावी. |

| **इतर (माती / जमीन तयार करणे)** | **इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला** |
|---|---|
| सामान्य सल्ला | हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. |